आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२७ ऑगस्ट २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- दहीकाल्याचा सण उत्साहात साजरा / मुंबईसह राज्यात दहिहंडीचा थरार

- राजकोट इथं नौदलाच्या सहकार्यानं छत्रपती शिवाजी महाराजांचा १०० फूट उंचीचा पुतळा उभारण्याचा विचार असल्याची देवेंद्र फडनवीस यांची माहिती

- आशा कर्मचाऱ्यांचा कर्तव्यावर असताना अपघाती मृत्यू किंवा अंपगत्वाबद्दल सानुग्रह अनुदानाबाबत शासन आदेश जारी

**आणि**

- राज्याच्या अनेक भागात मुसळधार पावसामुळे नद्यांच्या पाणीपातळीत वाढ, विविध धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरू

**<><><><><>**

राज्यात आज दहीकाल्याचा सण उत्साहात साजरा होत असून विशेषतः मुंबई, ठाण्यात ठिकठिकाणी गोविंदाचा थरार रंगला. अनेक दिवसाच्या सरावानंतर गोविंदा पथकं उंचच उंच बांधलेल्या दहीहंड्या फोडत आहेत. या दहीहंड्यांसाठी लाखो रुपयांची बक्षिसेही लावण्यात आली आहेत. राजकीय पक्षांनीही मोठ्या हिरीरीनं या उत्सवात भाग घेतला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आज या उत्सवाला हजेरी लावली. अनेक थरांचे हे मानवी मनोरे पाहण्यासाठी जागोजागी गर्दी पाहायला मिळत आहे. दहीहंडी संस्कृतीसाठी प्रसिद्ध असलेल्या गिरगांव भागात विविध सामाजिक विषयांवर भाष्य करणारे चित्ररथ आज काढण्यात आले. यंदा महिलांवर होणाऱ्या अत्याचारांवर याद्वारे प्रामुख्याने भाष्य करण्यात आलं. अंधेरीतल्या वेसावे कोळीवाड्यात पुरातन परंपरेप्रमाणे लाकडी काठीला टोकदार अणकुचीदार भाला बांधून भाल्यानं दहीहंडी फोडण्यात आली. दहीहंडी उत्सवादरम्यान नागरिकांच्या करमणुकीसाठी विविध

सांस्कृतिक कार्यक्रम ठेवण्यात आले आहेत. ठाण्यात पाचशेपेक्षा अधिक गोविंदा पथकांनी दहीहंडी फोडण्यासाठी हजेरी लावली. नाशिकच्या पुरातन मुरलीधर मंदिरासह इतरत्र श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि दहीहंडीचा उत्साह पाहायला मिळत आहे. गंगापूर रोड, इंद्रकुंड, चेतना नगर या भागात मोठ्या दहीहंड्यांचं आयोजन करण्यात आलं आहे. नागपूरच्या दहीहंडी उत्सवात भंडारा, गोंदिया इथून आलेल्या गोविंदा पथकांनीही भाग घेतला आहे.

**<><><><>**

राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५ फुटी पुतळा काल कोसळला, ही सर्वांसाठी अत्यंत दु:खद घटना असून नौदलाच्या मदतीनं भव्य आणि मजबूत पुतळा सरकार बसवणार असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं.

शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याचं कारण शोधण्यासाठी आणि पुतळा पुनर्स्थापित करण्यासाठी एक पथक रवाना करण्यात आल्याची माहिती भारतीय नौदलानं एका निवेदनाद्वारे दिली आहे. या संदर्भात राज्य सरकार आणि तज्ज्ञांच्या सहकार्यानं काम सुरू असल्याचं नौदलानं म्हटलं आहे.

**<><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्याची नैतिक जबाबदारी स्वीकारत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केली आहे. कराड इथं चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाालं, त्यावेळी चे बोलत होते. यावेळी काँग्रेसचे नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

काँग्रेसचे विधानपरिषदेतले गटनेते सतेज पाटील यांनी या किल्ल्याला भेट देऊन दुर्घटनाग्रस्त जागेची पाहणी केली. छत्रपतींचा पुतळा कोसळणं ही दुर्दैवी बाब

असून सरकारने यासाठी जनतेची माफी मागावी असं पाटील म्हणाले. दरम्यान, छत्रपतींचा पुतळा कोसळल्याच्या घटनेचा निषेध करण्यासाठी काँग्रेसने कोल्हापूर आणि नाशिकमध्ये आंदोलन केलं.

**<><><><><>**

आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तक यांच्या कामाचं स्वरुप लक्षात घेऊन त्यांना कर्तव्य बजावताना मृत्यू आला तर १० लाख रुपये आणि कायमस्वरुपी अपंगत्व आलं तर ५ लाख रुपयांचं सानुग्रह अनुदान लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या संदर्भात राज्य शासनाने आदेश जारी केले असून १ एप्रिल २०२४पासून हा निर्णय लागू करण्यास मान्यता दिली आहे. यासाठी प्रत्येक वर्षाला १ कोटी ५ लाख इतका आवर्ती निधी मंजूर करण्यात आला आहे.

**<><><><><>**

वैद्यकीय व्यवसायातल्या व्यक्तींची सुरक्षा आणि त्यांच्या कामाच्या ठिकाणची परिस्थिती सुरक्षित रहावी याकरता शिफारशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या राष्ट्रीय कृती दलाची पहिली बैठक आज नवी दिल्लीत झाली. कॅबिनेट सचिव बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या कृती दलाकरता सूचना नोंदवण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने “Suggestions to NTF” या नावाने नवीन पोर्टल सुरु केलं आहे.

यासंदर्भात राज्यसरकारांनी आपापल्या राज्यात वैद्यकीय महाविद्यालयांमधे किंवा रुग्णालयांमधे केलेल्या सुरक्षा उपाययोजनांची माहितीही आरोग्य मंत्रालयानं मागवली आहे. यासंदर्भात विविध संबंधितांनी आपल्याकडे व्यक्तिशः सूचना केली असून आतापर्यंत ३०० ते ४०० सूचना मिळाल्या असल्याचं कृती दलाच्या सदस्यांनी बैठकीत सांगितलं. कृती दलाची बैठक उद्या दूरदृष्यप्रणालीद्वारे होणार आहे. सुरक्षेसाठी तात्काळ करण्याच्या उपाययोजनांवर त्यावेळी चर्चा होईल. केंद्रीय आरोग्य सचिव आणि केंद्रीय गृह सचिव बैठकीच्या अध्यक्षस्थानी असतील तसंच

सर्व राज्यांचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक त्यात सहभागी होतील.

<><><><><>

रत्नागिरी इथं एका प्रशिक्षणार्थी परिचारिकेवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणाचा तपास करण्यासाठी विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षकांनी दिली आहे. या पथकात महिला निरीक्षक, दोन महिला उपनिरीक्षक आणि इतर पोलीस कर्मचारी असून त्यात तांत्रिक/वैज्ञानिक अनुभव असलेल्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या प्रकरणी आरोपीला लवकरात लवकर शोधून काढण्याचे निर्देश दिल्याची माहिती पालकमंत्री उदय सामंत यांनी दिली आहे.

<><><><><>

राज्याच्या अनेक भागात मुसळधार पावसामुळे नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्यात राधानगरी, गगनबावडा, आजरा आणि चंदगड तालुक्यात अतिवृष्टी झाली असून, धरण क्षेत्रातही जोरदार पाऊस होत आहे. सर्वच धरणं पूर्ण क्षमतेने भरली असून, पाण्याचा विसर्ग वाढल्याने नद्यांच्या पातळीत झपाट्याने वाढ होत आहे. पंचगंगा नदीचं पाणी पात्राबाहेर आल्यानं ४२ बंधारे पाण्याखाली गेले आहेत.

**सातारा** जिल्ह्यातल्या कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पाऊस होत असल्यामुळे धरणांमध्ये पाण्याची आवक वाढली आहे. त्यामुळे आज कोयना धरणाच्या पायथा विद्युतगृहाचे दोन्ही संच सुरू करण्यात आले असून, दोन हजार शंभर घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाणी नदीपात्रात सोडण्यात येत आहे. यामुळे कोयना नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात** पैठण इथल्या जायकवाडी धरणाचा पाणी साठा ५६ टक्क्यांवर पोहोचला आहे. धरणात सध्या अहमदनगर तसंच नाशिक

जिल्ह्यातल्या पाणलोट क्षेत्रातून ८४ हजार ४४६ घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाण्याची आवक होत आहे. **नाशिक** जिल्ह्यात गेल्या तीन ते चार दिवसांपासून जोरदार पाऊस असून इगतपूरी आणि त्र्यंबकेश्वर येथे अतिवृष्टी झाली होती. मात्र, आता पावसाचा जोर कमी झाला आहे. गंगापूर धरणातून काल रात्रीपर्यंत ९ हजार ४५० क्युसेक प्रवाह सुरू होता तो आता १२०४ क्युसेक इतका करण्यात आला आहे. त्यामुळे नदीचा पूर ओसरण्यास सुरुवात झाली आहे. दारणा धरणातून ५ हजार ८४८ तर नांदूर मध्यमेश्वर धरणातून ४५ हजार ७६९ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

**<><><><><>**

नांदेडचे खासदार वसंतराव चव्हाण यांच्या पार्थिवावर आज दुपारी नायगाव इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे चिरंजीव रणजीत चव्हाण यांनी अग्नी दिला. नांदेडचे पालकमंत्री गिरीश महाजन, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, तसंच मराठवाड्यातले इतर खासदार यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

नेपाळ बस दुर्घटनेत जखमी झालेल्या रुग्णांना काल उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाच्या मदतीने नेपाळहून मुंबईत आणण्यात आलं. यात भुसावळ तालुक्यातल्या वरणगाव इथल्या एकूण ७ जखमी प्रवाशांचा समावेश आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दुपारी या जखमींची बॉम्बे रुग्णालयात जाऊन विचारपूस केली. उद्या आणखी ४ जखमींना मुंबई आणण्यात येणार असून त्यांच्यावर ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार करण्यात येणार आहेत. या सर्व जखमींना उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षामार्फत सर्वतोपरी मदत केली जाणार आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेला ३ ऑक्टोबरपासून दुबई इथं

सुरुवात होणार आहे. आयसीसी अर्थात आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं काल विश्वचषकाच्या वेळापत्रकाची घोषणा केली. विश्वचषक स्पर्धेत भारत, ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, न्यूझिलँड आणि पाकिस्तानचा समावेश गट अ मध्ये आहे, तर दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, वेस्ट इंडिज, बांगलादेश आणि स्कॉटलँड यांचा समावेश गट ब मध्ये करण्यात आला आहे. प्रत्येक संघ दोन गट सामने खेळतील, दोन्ही गटामधले प्रत्येकी दोन सर्वोत्कृष्ट संघ उपांत्य फेरीत पोहोचतील. ६ ऑक्टोबरला भारत आपला पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी लढत देईल. ४ ऑक्टोबरला न्यूझिलँड, ९ ऑक्टोबरला श्रीलंकेविरोधात तर १३ ऑक्टोबरला ऑस्ट्रेलियाविरोधात भारतीय संघाचा सामना होणार आहे. १७ आणि १८ ऑक्टोबरला विश्वचषकाचे उपांत्य सामने खेळले जाणार आहेत. तर २० ऑक्टोबरला अंतिम सामना होईल.

**<><><><><>**

पश्चिम रेल्वे मार्गावर गोरेगाव-कांदिवली दरम्यान सहाव्या मार्गाचं काम सुरू करण्यात आलं आहे. यासाठी आजपासून ५ ऑक्टोबरपर्यंत ३५ दिवसांचा ब्लॉक घेण्यात येणार असल्याचं पश्चिम रेल्वेनं कळवलं आहे. गणेशोत्सवाच्या काळात म्हणजे ११ ते १७ सप्टेंबर दरम्यान ब्लॉक नसेल.

**<><><><><>**

राज्यात मध्य महाराष्ट्र आणि कोकणात काही ठिकाणी आज जोरदार तर तुरळक ठिकाणी अति जोरदार पाऊस पडल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे. कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी तर विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस झाला. पुढल्या दोन दिवसात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तर मराठवाड्यातल्या तुरळक ठिकाणी तर विदर्भात अनेक ठिकाणी पाऊस पडणार असल्याचं हवामान विभागानं सांगितलं आहे.

**//<><><><><>//**